मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 09 सप्टेंबर 2026 | पान - 1

# कल्याणकारी योजनांच्या अर्ज प्रक्रियेला शुभारंभ

## समाज विकास विभागाच्या कल्याणकारी योजनांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते शुभारंभ

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अर्ज स्वीकृती प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. महानगरपालिका क्षेत्रातील महिला, बालके, दिव्यांग व्यक्ती, मागासवर्गीय तसेच गरजू व वंचित घटकांतील पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अर्ज प्रक्रिया अधिक सुटसुटीत व नागरिकाभिमुख करण्यावर भर देण्यात आला आहे.**





> “महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. माहितीचा अभाव, तांत्रिक अडचणी किंवा अर्ज प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे कोणताही पात्र नागरिक लाभापासून वंचित राहू नये. त्यासाठी संबंधित विभागांनी योजनांची प्रभावी जनजागृती करून अर्ज प्रक्रिया सुलभ व पारदर्शक ठेवावी. प्राप्त अर्जांवर विहित कार्यपद्धतीनुसार वेळेत कार्यवाही करून पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे.”
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

समाज विकास विभागामार्फत विविध घटकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी महानगरपालिकेच्या स्तरावर विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची माहिती सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, अर्ज प्रक्रियेबाबत आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे तसेच विहित निकषांनुसार पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

अर्ज प्रक्रियेदरम्यान नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवू नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्याबरोबरच आवश्यकतेनुसार ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या. विशेषतः डिजिटल माध्यमांचा वापर करताना अडचणी येणारे नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांग व्यक्तींना अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून देण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले.

अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे, पात्रतेचे निकष, अर्ज सादर करण्याची कार्यपद्धती तसेच योजनांशी संबंधित आवश्यक माहिती नागरिकांना स्पष्ट व सुलभ स्वरूपात उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला. अर्जातील त्रुटी अथवा तांत्रिक अडचणींमुळे पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, याची संबंधित विभागाने दक्षता घ्यावी. तसेच नागरिकांना अर्ज प्रक्रियेसाठी अनावश्यकपणे कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता भासणार नाही, यासाठी आवश्यक प्रशासकीय व्यवस्था सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून महिला व बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासोबतच पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी आवश्यक जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे.

प्राप्त अर्जांची विहित निकषांनुसार छाननी करणे, पात्र लाभार्थ्यांची निवड नियमानुसार करणे तसेच मंजूर योजनांचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना निर्धारित कालमर्यादेत उपलब्ध करून देण्यासाठी समाज विकास विभागाने नियोजनबद्ध कार्यवाही करावी, असेही यावेळी सांगण्यात आले. अर्ज स्वीकृतीपासून ते लाभ वितरणापर्यंतच्या प्रक्रियेत पारदर्शकता, सुलभता आणि गतिमानता राखण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, समिती सदस्या पल्लवी जगताप, रेशमा भुजबळ, निता पाडाळे, सुप्रिया चांदगुडे, सारिका मासुळकर, मनिषा लांडे, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे यांच्यासह समाज विकास विभागाचे अधिकारी व संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

समाज विकास विभागामार्फत सन २०२६-२७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसाठी पात्र नागरिकांनी विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत. तसेच संबंधित योजनांची पात्रता व अटींची माहिती घेऊन महानगरपालिकेच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पिंपरी चिंचवड शहरात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या नायजेरियन महिलेवर पोलिसांची कारवाई

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विशेष शाखा-२ अंतर्गत परकीय नागरिक नोंदणी विभागाने बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या एका नायजेरियन महिलेवर कारवाई करून तिला तिच्या मायदेशी हद्दपार केले आहे.**



हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक परदेशी महिला बेकायदेशीरपणे राहत असल्याची गोपनीय माहिती परकीय नागरिक नोंदणी विभागाला प्राप्त झाली होती. त्यानुसार विभागाने संबंधित महिलेची चौकशी केली असता तिच्याकडे वैध पासपोर्ट व व्हिसा नसल्याचे आढळून आले. त्यानंतर तिची बायोमेट्रिक पडताळणी ऑनलाईन डीपीएम प्रणालीद्वारे करण्यात आली.

पडताळणीत संबंधित महिलेचे नाव गिफ्ट ओकोह (GIFT OKOH) असून ती नायजेरिया देशाची नागरिक असल्याचे निष्पन्न झाले. ही महिला २३ सप्टेंबर २०१४ रोजी वैद्यकीय व्हिसावर भारतात आली होती. जयपूर व पालघर येथे वास्तव्यानंतर ती पिंपरी-चिंचवड परिसरात राहत होती. मात्र, तिच्या पासपोर्ट व व्हिसाची मुदत संपल्यानंतरही ती भारतात वास्तव्यास असल्याचे तपासात उघड झाले.

संबंधित महिलेकडे कोणतीही वैध कागदपत्रे नसल्याने तिला मायदेशी परत पाठविण्यासाठी नायजेरियन उच्चायुक्तालय, नवी दिल्ली यांच्याकडून इमर्जन्सी ट्रॅव्हल डॉक्युमेंट तसेच एफआरआरओ मुंबई कार्यालयाकडून एक्झिट परमिट प्राप्त करण्यात आले. यानंतर ८ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून संबंधित महिलेला नायजेरिया येथे डिपोर्ट (हद्दपार) करण्यात आले. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर पुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड व डॉ. बसवराज तेली, पोलीस उपायुक्त धीरज पाटील आणि सहायक पोलीस आयुक्त सुनील पंधरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. विशेष शाखा-२ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नरवाड, सहायक पोलीस निरीक्षक राजश्री पावरा तसेच त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

# पिंपरी चिंचवडच्या शाश्वत विकासासाठी पुढील 50 वर्षांचा आराखडा

## विरोध नोंदवताना संवैधानिक मार्गाचा अवलंब करा - राहुल नार्वेकर यांचा इशारा

» पिंपरी | प्रतिनिधी

**विरोध नोंदवताना प्रत्येकाने संवैधानिक मार्गांचा अवलंब केला पाहिजे. अन्यथा अराजकाची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा इशारा महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दिला.**

मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित विशेष सन्मान सोहळ्यास महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, आमदार अमित गोरखे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी, लोकमतचे संपादक संजय आवटे, दैनिक पुढारीचे संपादक सुनील माळी, लेट्स अप मराठीचे संपादक योगेश कुटे, पुढारी माध्यम समूहाच्या सहसंपादिका मृणालिनी नानिवडेकर, न्यूज 18 मराठीचे सहसंपादक विशाल परदेशी यांच्यासह विविध माध्यम समूहांचे पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्यात विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना राहुल नार्वेकर बोलत होते. यावेळी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या पुढील ५० वर्षांच्या शाश्वत विकासाचे व्हिजन संगणकीय सादरीकरणाद्वारे मांडले.

राहुल नार्वेकर यांनी पिंपरी चिंचवडच्या विकासाचे कौतुक करताना सांगितले की, पिंपरी चिंचवड हे आशिया खंडात आणि जगभरात नावाजलेले तसेच वेगाने विकसित होणारे शहर आहे. शहरातील पायाभूत सुविधा आणि नागरी सोयी-सुविधा उल्लेखनीय आहेत. मात्र, भविष्यातील गरजा आणि वाढते शहरीकरण यांची सांगड घालणे आवश्यक आहे. उपलब्ध नागरी सुविधांचा सर्वांगीण विचार करून पिंपरी चिंचवडच्या सूक्ष्म आणि नियोजनबद्ध विकासाचे मॉडेल तयार करण्याचे उद्दिष्ट आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी समोर ठेवले आहे. या उद्दिष्टाच्या दिशेने ते निश्चितपणे यशस्वी वाटचाल करतील आणि शहराला विकासाची नवी उंची प्राप्त करून देतील. बऱ्याच वर्षांनंतर पिंपरी चिंचवड शहरात येण्याची संधी मिळाली. पूर्वी गावाच्या स्वरूपात असलेल्या या परिसराने गेल्या काही दशकांत अत्यंत प्रभावशाली आणि विकसित शहर म्हणून घेतलेली झेप ही केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे, तर संपूर्ण आशियासाठी एक उत्तम उदाहरण आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही आशियातील नावाजलेल्या महानगरपालिकांपैकी एक असून, वेगाने होणारे शहरीकरण अधिक नियोजनबद्ध आणि शाश्वत पद्धतीने कसे करता येऊ शकते, याचे उत्तम उदाहरण या शहरातून पाहायला मिळते, असेही त्यांनी सांगितले. शहराचा विकास केवळ पायाभूत सुविधांच्या निर्मितीपुरता मर्यादित नसतो. वाढत्या शहरीकरणासोबत नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे, प्रशासन अधिक सक्षम करणे आणि नागरिकांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणे आवश्यक आहे. या दृष्टीने पिंपरी चिंचवडमध्ये होत असलेले काम महत्त्वपूर्ण आहे, असे राहुल नार्वेकर यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात राहुल नार्वेकर यांची प्रकट मुलाखतही रंगली. विविध माध्यमांच्या संपादकांनी विचारलेल्या प्रश्नांना राहुल नार्वेकर यांनी दिलखुलास उत्तरे देत जोरदार फटकेबाजी केली. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी सन्मान स्वीकारताना म्हणाले, पिंपरी चिंचवड शहराने मला आपल्यात सामावून घेतले आहे. या शहराचा नावलौकिक अधिक उंचावत असताना त्याचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधणे हे माझ्यासमोरील प्रमुख उद्दिष्ट आहे. आज मिळालेल्या या सन्मानामुळे माझ्या जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली असून, शहराच्या विकासासाठी निश्चितपणे प्रयत्नांची पराकाष्ठा करेन.

शहरातील विविध समस्या, नागरिकांच्या अडचणी आणि प्रशासनासमोरील प्रश्न शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम पत्रकार करीत असतात. नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासोबतच प्रशासनाच्या कामकाजाकडे वस्तुनिष्ठपणे पाहण्याचे आणि आवश्यक तेथे प्रश्न उपस्थित करण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात. पत्रकारांनी केलेली टीका तसेच त्यांनी प्रशासनासमोर मांडलेल्या समस्या शहराच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. त्यातून महापालिका प्रशासनाला आपल्या कामातील त्रुटी समजतात आणि त्यामध्ये सुधारणा करण्याची संधी मिळते, असे डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले. पत्रकारांनी प्रशासनाला नेहमी आरसा दाखवायला हवा आणि त्या आरशात दिसणारा चेहरा सुधारण्याचे काम प्रशासनाने केले पाहिजे. पत्रकारांनी मांडलेल्या प्रश्नांकडे टीका म्हणून न पाहता त्यातून शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा ओळखण्याचा प्रयत्न प्रशासनाने करावा, अशी भूमिका डॉ. सूर्यवंशी यांनी व्यक्त केली.

शहराचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी, प्रसारमाध्यमे आणि नागरिक यांच्यातील समन्वय महत्त्वाचा आहे. नागरिकांच्या अपेक्षा समजून घेत, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून आणि पारदर्शक पद्धतीने प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी महापालिका कार्यरत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



### सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष यशवंत भोसले, एसएनबीपी स्कूलचे अध्यक्ष डी. के. भोसले, महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे, महाराष्ट्रातील पहिले मीडिया टॉवर उभारणारे औटी ग्रुपचे अध्यक्ष बाबासाहेब औटी आणि 'दान से उडान' उपक्रम यशस्वीपणे राबविणारे रवी घाटे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मुंबई लोकमतचे वरिष्ठ पत्रकार दुर्गेश सोनार, दैनिक सकाळचे मुख्य वार्ताहर पितांबर लोहार, पुढारीचे वरिष्ठ वार्ताहर मिलिंद कांबळे आणि ज्येष्ठ पत्रकार माधव सहस्त्रबुद्धे यांचा पत्रकारितेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रदेश उपाध्यक्ष विवेक इनामदार यांनी आभार मानले. संदीप चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.

### पुढील ५० वर्षांसाठी पिंपरी चिंचवडचा विकास आराखडा

यावेळी संगणकीय सादरीकरणाद्वारे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या पुढील ५० वर्षांच्या शाश्वत, नियोजित आणि दीर्घकालीन विकासाचे विविध पैलू मांडले. यामध्ये आगामी ५० वर्षांसाठी पाणीपुरवठ्याचे दीर्घकालीन नियोजन, महापालिका हद्दीतील उंचावरील पाणीसाठे, पवना व इंद्रायणी नदीकाठ विकास प्रकल्प, ड्रेनेज मास्टर प्लॅन, पुढील २५ वर्षांसाठी शाश्वत घनकचरा व्यवस्थापन, महापालिकेच्या ताब्यात आलेल्या आरक्षित जागांची सद्यस्थिती व भविष्यातील विकास योजना, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, शहरी नाले सुधारणा प्रकल्प, डीपी रस्ते, डेटा सेंटर धोरण आराखडा आणि पार्किंग धोरण यांचा समावेश आहे. तसेच शहराचे सुशोभीकरण, शहरी हरितीकरण, उद्यानांचा विकास व अद्ययावतीकरण, रुग्णालय सेवांचे बळकटीकरण, भटक्या कुत्र्यांसाठी निवारा केंद्रे, बल्क वेस्ट जनरेटरसाठी नोंदणीकृत भागीदारांमार्फत सुविधा, प्रतिभा शोध कार्यक्रम, अभ्यासिका व व्यायामशाळांची संख्या वाढविणे, स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी स्वाभिमान धोरण, सर्वांसाठी सुलभ पिंपरी चिंचवड, दिव्यांगांसाठी रोजगार निर्मिती, 'ऑपरेशन कायापालट' अंतर्गत स्वच्छता गृह धोरण, क्रीडा सुविधा, पीसीएमसी ग्रँड मॅरेथॉन, सायन्स पार्क विकास, महापालिका कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण धोरण, सेवानिवृत्तीच्या दिवशी पेन्शन योजना, प्रशासकीय कार्यक्षमता व पारदर्शकता, सुशासन सुधारणा तसेच 'स्वागतम ई-पास' आदी विविध उपक्रमांची माहिती डॉ. सूर्यवंशी यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

---

# चिखलीतील पाटील नगर आणि सोनावणे वस्ती रस्त्यांचे काम रखडले; नागरिक, वाहनचालक त्रस्त

» पिंपरी | प्रतिनिधी

**चिखली येथील पाटील नगर आणि सोनावणे वस्ती परिसरातील मुख्य रस्त्यांची कामे गेल्या अनेक महिन्यांपासून अर्धवट स्थितीत रेंगाळली असून, यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांवर ठिकठिकाणी पडलेले मोठे खड्डे, पसरलेली खडी आणि धुळीच्या साम्राज्यामुळे या भागातून ये-जा करणे धोकादायक बनले आहे.**



> पाटील नगर आणि सोनावणे वस्ती रस्त्यावरील युटिलिटी, ड्रेनेज आणि पाणीपुरवठ्याची सर्व कामे पूर्ण करून रस्त्याचा बेस तयार करण्यात आला आहे. पावसाळ्यामुळे डांबर प्लँट बंद असून खडी ओली असल्याने हीटिंगसाठी अडचण येत आहे. डांबर उपलब्ध होताच आणि पावसाने उघडीप देताच डांबरीकरणाचे अंतिम काम पूर्ण केले जाईल.
>
> \- शिवाजी चौरे , अभियंता, स्थापत्य विभाग

टाऊन हॉलच्या बाजूने सोनावणे वस्ती आणि गावठाणाकडे जाणाऱ्या मार्गासह पाटील नगरमधील अंतर्गत रस्त्याची दुरवस्था झाली असून, दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक महिन्यांपूर्वी रस्त्याचे खोदकाम करून ठेवण्यात आले, मात्र त्यानंतर काम संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या रस्त्यांच्या कामात सुरुवातीला जागेच्या भूसंपादनावरून स्थानिक पातळीवर विरोध झाला होता. मात्र, महापालिकेने कारवाई करून आवश्यक जागा ताब्यात घेतली असून रस्त्याचा पाया (बेस) आणि क्रश लेव्हलचे काम पूर्ण केले आहे. तसेच रस्त्याखालील आवश्यक ड्रेनेज लाईन, पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईन आणि विविध युटिलिटी वाहिन्या टाकण्याचे कामही मार्गी लागले आहे. केवळ अंतिम टप्प्यातील डांबरीकरणाचे काम बाकी असून, सध्या सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे डांबर प्लँटवरील खडी ओली असल्याने हीटिंग प्रक्रियेत तांत्रिक अडचणी येत आहेत.

# होर्मुझच्या अस्थिरतेचा बाप्पाच्या रंगांवर परिणाम

## रंगांच्या दरात वाढ; पीओपी, थिनर, ब्रश, वाहतूक आणि मजुरीही महाग

**» पुणे | प्रतिनिधी**

**हजारो किलोमीटर दूर असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतील अस्थिरतेचा 'रंग' यंदा पुण्यातील गणपती बाप्पालाही चढला आहे. आखातातील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या बाजारात निर्माण झालेल्या चढ-उतारांचा फटका पेंट उद्योगाला बसला असून, गणेशमूर्ती रंगविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही रंगांच्या दरात वर्षभरात किलोमागे तब्बल ४५० रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. त्यात पीओपी, थिनर, ब्रश, वाहतूक आणि कारागिरांची मजुरीही महागल्याने मूर्तिकारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. परिणामी, यंदा गणेशमूर्तींच्या किमतीही २० ते ३० टक्क्यांनी वाढल्या आहेत.**



बाप्पाचे डोळे रेखाटण्यापासून पीतांबर, शेला, मुकुट, दागिने आणि आसनावरील नक्षीकामापर्यंत प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळ्या रंगछटा वापरल्या जातात. छोट्या घरगुती मूर्तींसाठी रंग कमी लागत असला, तरी सार्वजनिक मंडळांच्या मोठ्या मूर्तींच्या रंगकामासाठी अनेक किलो रंग लागतो. त्यामुळे रंगांच्या दरातील काहीसे रुपयांची वाढही मोठ्या मूर्तींच्या उत्पादन खर्चात हजारो रुपयांची भर घालत आहे. पेंटनिर्मितीसाठी लागणारे सॉल्व्हेंट, रेजिन, बाइंडरसह अनेक घटक पेट्रोलियम आणि पेट्रोकेमिकल उद्योगाशी निगडित आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमती आणि पुरवठ्यातील अस्थिरतेचा परिणाम या कच्च्या मालावर होत आहे. त्याचा फटका पुढे पेंट उत्पादकांपासून विक्रेते आणि मूर्तिकारांपर्यंत पोहोचत असल्याचे या क्षेत्रातील व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

मूर्तीच्या मुकुट-दागिन्यांना झळाळी देणाऱ्या गोल्डन पावडरचा किलोचा दर २ हजारांवरून २ हजार ४५० रुपयांवर पोहचला आहे. गोल्डन ऑईलचा लिटरचा दर २७० वरून ३८० रुपये झाला आहे. ऑईल बॉण्डच्या २० किलो पॅकसाठी पूर्वी ९०० रुपये मोजावे लागत होते; आता तो ११०० रुपयांवर गेला आहे. बॉडी स्पेशल प्लास्टिक रंगाचा २० किलोचा दरही ६२०० वरून ७२०० रुपये झाला आहे. यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रंगांच्या वाढलेल्या किमतीमुळे मूर्तिकारांसमोर उत्पादन खर्चाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. विशेषतः मोठ्या आकाराच्या मूर्तींना अधिक रंग आणि विविध प्रकारच्या फिनिशिंग मटेरियलची आवश्यकता असल्याने खर्चात लक्षणीय वाढ होत आहे. त्यातच दागिने, मुकुट आणि सजावटीच्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याचे दरही वाढल्याने एकूण बजेटवर परिणाम होत आहे. वाढलेला खर्च भरून काढण्यासाठी काही मूर्तिकारांना मूर्तींच्या किमतीत वाढ करण्याशिवाय पर्याय नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे गणेश मंडळांनाही यंदा मूर्ती खरेदीसाठी अधिक आर्थिक तरतूद करावी लागत आहे. घरगुती गणपतीच्या मूर्तींच्या किमतींवरही या वाढीचा काही प्रमाणात परिणाम जाणवत आहे. परिणामी, गणेशोत्सवाच्या तयारीत मूर्तींच्या आकर्षक रंगसंगतीसोबतच वाढलेल्या खर्चाचे गणितही मूर्तिकार आणि मंडळांना सांभाळावे लागत आहे.

दरम्यान, गणेशमूर्तींच्या रंगकामात दर्जा आणि आकर्षकता टिकवून ठेवणे हे मूर्तिकारांसाठी तितकेच महत्त्वाचे आहे. ग्राहकांच्या पसंतीनुसार पारंपरिक रंगछटांसोबतच मेटॅलिक, गोल्डन आणि विशेष फिनिशिंगचा वापर वाढला आहे. त्यामुळे केवळ रंगांची किंमतच नव्हे, तर विविध सजावटीच्या साहित्याच्या दरवाढीचाही थेट परिणाम मूर्तीच्या अंतिम किमतीवर होत आहे. काही मूर्तिकारांनी खर्च नियंत्रणात ठेवण्यासाठी रंगांचा वापर अधिक नियोजनबद्ध पद्धतीने करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, मूर्तीच्या सौंदर्यात तडजोड न करता दर्जेदार रंगसाहित्य वापरण्याला त्यांचे प्राधान्य आहे. गणेशोत्सव जसजसा जवळ येत आहे, तसतशी मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये रंगकामाला वेग आला असून अंतिम रूप देण्याची लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे यंदा बाप्पाच्या मूर्ती अधिक आकर्षक दिसणार असल्या, तरी त्यामागे वाढलेल्या रंगसाहित्याच्या खर्चाचे मोठे आव्हान असल्याचे स्पष्ट होत आहे.

> “ मूर्ती आकर्षक दिसण्यासाठी रंगकामात तडजोड करता येत नाही. मात्र, यंदा रंगांबरोबर पीओपी, थिनर, ब्रश आणि मजुरीही महागली आहे. प्रत्येक मूर्तीमागचा उत्पादन खर्च वाढला आहे. संपूर्ण वाढ ग्राहकांवर टाकणे शक्य नसल्याने मूर्तिकारांनाही काही भार सहन करावा लागत आहे.
>
> - गणेश कुंभार, मूर्तिकार, गणेश आर्ट्स, लोहगाव

> “ गोल्डन पावडरपासून विविध शेडपर्यंत जवळपास सर्वच रंग महागले आहेत. मोठ्या मूर्तींसाठी रंगाचे प्रमाण जास्त असल्याने खर्चातील वाढ हजारोंमध्ये जाते. त्यात वाहतूक आणि कारागिरांची मजुरी वाढल्याने यंदा मूर्तींच्या किमती वाढविण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही.
>
> - अक्षय खेडकर, मूर्तिकार, अनुप्रिया आर्ट्स, कसबा

---

## चाकणमध्ये भीषण वाहतूककोंडी; पुणे-नाशिक महामार्गावर ५ ते ७ किलोमीटर वाहनांच्या रांगा

**» पुणे | प्रतिनिधी**

**चाकण औद्योगिक वसाहतीतील पुणे-नाशिक महामार्गावर सकाळपासून वाहतुकीचा पुरता बोजवारा उडाला आहे. पाच ते सात किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने कामगार, प्रवासी आणि रुग्णवाहिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.**



सकाळच्या शिफ्टच्या वेळी वाहनांची संख्या अचानक वाढल्याने महामार्गावरील वाहतूक अत्यंत संथ झाली. त्यामुळे अनेक वाहनचालकांना तासन्तास या कोंडीत अडकून राहावे लागले. रुग्णवाहिकांनाही या वाहतूककोंडीतून मार्ग काढताना तीव्र अडचणी येत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.

चाकण औद्योगिक वसाहतीत दररोज लाखो कामगारांची ये-जा असते. त्यातच वाढती वाहनसंख्या आणि अपुरी वाहतूक व्यवस्था यांमुळे येथे वारंवार कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे आता प्रशासनाने तात्पुरत्या उपायांपेक्षा कायमस्वरूपी वाहतूक नियोजन करावे, अशी जोरदार मागणी केली जात आहे. "चाकणची ही भीषण वाहतूककोंडी अखेर कधी सुटणार?" असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

वाहतूककोंडीमुळे कामगार, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना दररोज मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांची अतिरिक्त नियुक्ती, पर्यायी मार्गांची व्यवस्था आणि रस्ते रुंदीकरणाच्या कामांना वेग देण्याची मागणी होत आहे.

## पुणे विभागातील १७३ विशेष बसचे बुकिंग फुल्ल

**आगामी गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या प्रवासाचे नियोजन अधिक सुखकर करण्यासाठी एसटीच्या पुणे विभागाने कंबर कसली आहे. यंदा गणेशोत्सवासाठी पुणे विभागातून सोडण्यात येणाऱ्या तब्बल १७३ एसटीबसचे बुकिंग पूर्ण (फुल्ल) झाले आहे. यामध्ये १२० गाड्यांचे ग्रुप बुकिंग, तर ५३ गाड्यांचे वैयक्तिक आरक्षण पूर्ण झाले आहे.**

होळी सणाप्रमाणेच दरवर्षी गणेशोत्सवासाठी पुण्याहून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. प्रवाशांची हीच अतिरिक्त सोय लक्षात घेऊन एसटी महामंडळाकडून दरवर्षी विशेष बस सोडल्या जातात. गेल्या वर्षी गणेशोत्सवासाठी पुणे विभागातून १७० जादा गाड्या धावल्या होत्या. यंदाही गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाकडून विशेष बससेवेचे नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

# नळस्टॉपपासून वारजेमार्गे माणिकबाग मेट्रोला गती!

## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी दोन ठिकाणी दुमजली उड्डाणपूल

» पुणे | प्रतिनिधी

**नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग मेट्रो मार्गाच्या उभारणीला अखेर गती मिळाली आहे. या मार्गावर महर्षी कर्वे पुतळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दुमजली उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत. या बाबतचा प्रस्ताव 'महामेट्रो'ने महापालिकेकडे पाठवला आहे. मात्र, हे उड्डाणपूल महापालिका की महामेट्रो उभारणार, याचा निर्णय अद्याप झालेला नसून, तो लवकरच होण्याची शक्यता आहे. हा निर्णय झाल्यानंतर या मेट्रो मार्गाच्या उभारणीला लवकरच सुरुवात होणार आहे.**



नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग या मार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाने गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात मंजुरी दिली. हा ६.१२ किलोमीटरचा उन्नत मेट्रो मार्ग असून, त्यावर सहा स्थानके असतील. त्यात कर्वे पुतळा, डहाणूकर कॉलनी, कर्वेनगर, वारजे, दौलतनगर आणि माणिकबाग या स्थानकांचा समावेश असेल. या मार्गासह स्थानकांच्या उभारणीसाठी 'महामेट्रो'ने निविदा काढल्या होत्या. परंतु, या मार्गावर कर्वे पुतळा आणि आंबेडकर चौकात दुमजली उड्डाणपूल उभारण्याची सूचना महापालिकेने केली होती. या पुलांची रचना आणि आराखडा अखेर अंतिम झाल्याने आता या मेट्रो मार्गाच्या उभारणीतील अडसर दूर होणार आहे.

कर्वे पुतळा आणि आंबेडकर चौक या दोन्ही उड्डाणपुलांसह तेथील मेट्रो मार्गाच्या उभारणीसाठी सुमारे ४०४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा अंदाज २०२१च्या बांधकाम दरांनुसार असून, त्यात आता १० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. हे दोन्ही उड्डाणपूल मेट्रो मार्गाचा भाग असतील. यातील पहिल्या मजल्यावर उड्डाणपूल आणि दुसऱ्या मजल्यावर मेट्रो मार्ग असेल. या उड्डाणपुलांचा आराखडा महामेट्रोने महापालिकेकडे सादर केला आहे. महापालिकेकडून यावर लवकरच अंतिम निर्णय होणे अपेक्षित आहे. या मेट्रो मार्गाच्या उभारणीसाठी 'महामेट्रो'ने जूनमध्ये निविदा मागविल्या होत्या. या निविदांना ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे उड्डाणपूल उभारण्यास वेळेत मंजुरी मिळाल्यास या वर्षअखेरीस या मार्गाचे काम सुरू होऊ शकते, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली.

### महर्षी कर्वे पुतळा चौक उड्डाणपूल

लांबी – १.६ किलोमीटर
ठिकाण – कर्वे रस्त्यावरील हनुमान मंदिर ते डहाणूकर कॉलनीतील हॉटेल मिर्च मसालाजवळ
खर्च – ३२७ कोटी रुपये

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक उड्डाणपूल

लांबी – ५०० मीटर
ठिकाण – डी मार्ट चौक ते कॅनॉल रस्त्याजवळ
खर्च – ७७ कोटी रुपये

# झाडकामात हलगर्जीपणा करणाऱ्यांना महापालिकेने बजाविली नोटीस!

» पुणे | प्रतिनिधी

**रस्ते स्वच्छतेची जबाबदारी देण्यात आलेल्या ठेकेदारांकडून योग्य पद्धतीने झाडकाम होत नसल्याचे समोर आल्याने. त्यामुळे या कामाची जबाबदारी असलेल्या चार ठेकेदारांना महापालिकेने 'कारणे दाखवा' नोटीस देऊन खुलासा मागविला आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी या नोटीस बजाविल्या आहेत.महापालिकेच्या वतीने रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी काही महिन्यांपूर्वी निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यामध्ये शहरातील विविध भागातील रस्ते झाडून स्वच्छ करण्याची जबाबदारी संबधित ठेकेदारांवर देण्यात आली आहे.**




ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट, प्रियंका एंटरप्रायझेस, सिद्धिविनायक एंटरप्रायझेस आणि सुमित फॅसिलिटीज या चार ठेकेदारांना नोटीस बजाविण्यात आली आहे. या ठेकेदारांकडून योग्य पद्धतीने रस्ते झाडण्याचे काम होत नसल्याचे या नोटिशीमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. महापालिकेने शहरातील झाडकामाची गुणवत्ता वाढविण्यासाठी तीन महिन्यांच्या कालावधीकरिता प्रायोगिक तत्त्वावर 'परफॉर्मन्स बेस्ड' झाडकाम प्रकल्प सुरू केला आहे. मात्र, या प्रकल्पांतर्गत जबाबदारी सोपविलेल्या काही संस्थांकडून अपेक्षित काम होत नसल्याचे अतिरिक्त आयुक्त नायर यांनी केलेल्या पाहणीत आढळून आले.

अतिरिक्त महापालिका आयुक्त नायर आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे यांनी २ सप्टेंबर २०२६ रोजी सातारा रस्त्याची संयुक्त पाहणी केली. या पाहणीत रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर कचरा, सुका कचरा आणि प्लास्टिक आढळले. पदपथ, दुभाजक तसेच रस्त्याच्या कडेला धूळ, माती आणि गाळ साचल्याचेही निदर्शनास आले. .रस्त्याची एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत स्वच्छता होत नसल्याने वाहनांच्या वर्दळीमुळे धुळीचे लोट निर्माण होत आहेत. त्यामुळे स्थानिक वायू आणि धूळ प्रदूषणामध्ये भर पडत असल्याचे महापालिकेने ठेकेदाराला बजाविलेल्या नोटिशीत म्हटले आहे. ठेकेदारांना देण्यात आलेल्या नोटिशीचा समाधानकारक खुलासा न दिल्यास आर्थिक व प्रशासकीय दंड, सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणे, कंत्राट रद्द करणे आणि संस्थेला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे. सातारा रस्ता, येरवडा-वडगावशेरी, ढोले पाटील रस्ता क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील कामांचा यामध्ये समावेश आहे. तसेच, शिवाजीनगर-घोले रस्ता, धनकवडी-कात्रज, औंध-बाणेर आणि हडपसर-मांजरी क्षेत्रीय कार्यालय, तसेच सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत केल्या जाणाऱ्या झाडकामांचा यामध्ये समावेश आहे.

अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर म्हणाले, शहरातील रस्ते स्वच्छ रहावेत, यासाठी महापालिकेने रस्ते आणि परिसराचे झाडकाम ठेकेदारांना दिले आहे. या ठेकेदारांनी त्यांना दिलेली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडणे आवश्यक आहे. महापालिकेने केलेल्या पाहणीत अनेक भागात झाडकाम होत नसल्याचे समोर आले. त्यामुळे संबधित ठेकेदारांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे.